रजि. नं : सी. ३४६

स्थापना : १२ मे १९४५

कळवा मध्यवर्ती ग्राहक सहकारी संस्था मर्यादित

कळवा, ठाणे - ४०० ६०५.

# सहकार बझार




सहकार निष्ठ पुरस्कार

७६ वा

वार्षिक अहवाल

२०१९-२०२०



संस्थेची बांधकाम सुरु असलेली भुसारआळी शाखा कळवा इमारत.


**मुख्य कार्यालय**

सहकार इमारत, स्टेशन रोड, कळवा, ठाणे - ४०० ६०५

फोन : २५३३ ७९२४ / २५३४ ७४२९

ई-मेल : info@sahakarbazar.com

वेबसाईट : www.sahakarbazar.com


सुचना : सभासदांनी स्वतःच्या इ-मेल आय. डी. व मोबाईल क्रमांकाची नोंद मुख्य कार्यालयात करावी.

## * वैधानिक लेखापरीक्षक *

**एन. एस. गोखले ॲन्ड कंपनी चार्टर्ड अकौंटंट**
ठाणे – ४०० ६०२

## * अंतर्गत लेखापरीक्षक *

**श्री. सुरेश आर बारी प्रमाणित लेखापरीक्षक**
कळवा, ठाणे – ४०० ६०५.

## * बँकर्स *

दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कळवा, ठाणे.
जी. पी. पारसिक जनता सहकारी बँक लि., कळवा, ठाणे.
बँक ऑफ इंडिया, कळवा, ठाणे.
ॲक्सिस बँक, ठाणे.
आय.सी.आय.सी.आय. बँक, पारसिक नगर, कळवा, ठाणे.

## तक्रार निवारण समिती

श्री. चिंतामण त्र्यंबक मराठे
श्री. गोपाळ शंकर कदम
श्री. विलासराव बंडोपंत बोंगाळे

## * सभासद अंतर्गत हिशेब तपासनीस *

श्री. चंद्रकांत भगवंतराव माळी
श्री. मिलिंद मधुसूदन दवणे
श्री. आनंद मारुती रावराणे
श्री. यशवंत विक्रम चव्हाण
श्री. रघुनाथ मारुती चव्हाण
श्री. गोपिनाथ कृष्णाजी पेंडूरकर
श्री. योगेश विजयानंद सोनावणे
श्री. सूर्यकांत जगन्नाथ सोनार
श्री. विद्याधर यशवंत भिडे
श्री. सोमनाथ तुकाराम खतोडे
श्री. राजेश दिपक करलाद
श्री. विजय शाम मुंबईकर
श्री. दिपक पांडुरंग करलाद
श्री. सुहास रामदास सावळे
श्री. विजय रामचंद्र बळेल
डॉ. आशा आर. पाटील
श्री. पंढरीनाथ दगा सूर्यवंशी
श्री. अशोक गणपत कांबळे
श्री. अनिल ब्रम्हानंद नरसियन
श्री. संजय जगन्नाथ चुंबळे
श्री. सीमा रमाकांत प्रधान
श्री. नरेंद्र देविदास चौधरी

## * मूळ संस्थापक *

| क्र. | नाव | वय | व्यवसाय | राहण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. दत्तात्रय भिकाजी पालये | ३३ | टेलरिंग | कळवा, जि. ठाणे. |
| २. | श्री. राजाराम व्ही. कर्णिक | ६६ | गव्ह. पेन्शनर | कळवा, जि. ठाणे. |
| ३. | श्री. अनंत ज. जोशी | ४० | म्यु. म. शिक्षक | कळवा, जि. ठाणे. |
| ४. | श्री. व्ही. डी. आर्यमाने | ४६ | कमि. एजंट | कळवा, जि. ठाणे. |
| ५. | श्री. महम्मद अब्बास दादामिया राऊत | ४२ | कॉन्ट्रॅक्टर | कळवा, जि. ठाणे. |
| ६. | श्री. विनायक ना. खारकर | ६२ | -- | कळवा, जि. ठाणे. |
| ७. | श्री. महम्मद युसुफ मकबा | ४० | धंदा | कळवा, जि. ठाणे. |
| ८. | श्री. शेरअली अली महम्मद | ३१ | धंदा | कळवा, जि. ठाणे. |
| ९. | श्री. भालचंद्र गोपाळ पालये | ३२ | नोकरी | कळवा, जि. ठाणे. |
| १०. | श्री. पांडुरंग बाळू फर्मन | ४७ | शेती | कळवा, जि. ठाणे. |
| ११. | श्री. काशिनाथ नारायण टकले | ६० | रिटायर्ड | कळवा, जि. ठाणे. |
| १२. | श्री. बाळाराम अनंत वैद्य | ६० | रिटायर्ड | कळवा, जि. ठाणे. |

७६ वर्ष गौरवशाली सेवेची

## शासनाच्या सन 2020 च्या सुधारणा अध्यादेशानुसार दिलेल्या अधिकाराप्रमाणे व्यवस्थापक समितीची विशेष सभा

### सभेची नोटीस

कोविड -१९ च्या पार्श्वभूमीवर शासनाने लॉकडाऊन जाहिर केले आहे. सदर लॉकडाऊन अनलॉक ५ ची प्रक्रिया चालू आहे. तथापि पन्नास पेक्षा जास्त सभासदांची सभा घेण्यास परवानगी नाही. अशा परिस्थितीत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,१९६० यातील सन २०२० च्या सुधारणा अध्यादेशानुसार व्यवस्थापक समितीस दिलेल्या अधिकाराप्रमाणे पुढील विषयांवर चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी व्यवस्थापक समितीची विशेष सभा बुधवार दि.१६/१२/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थेच्या मुख्य कार्यालयात आयोजित करण्यात आली. सदर सभेत पारित झालेले ठराव पुढील होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये अनुसमर्थनार्थ मांडण्यात येतील.

### सभेपुढील विषय

१) दिनांक १२/०८/२०१९ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तात वाचून कायम करणे.
२) सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाची नफा वाटणी व लाभांश वाटणीस मंजूरी देणे.
३) पोटनियम क्र.३ मधील मर्यादेस अधिन राहून उभारावयाच्या बाहेरील कर्जाच्या मर्यादा ठरविणे.
४) मागील आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षणाच्या अहवालाची व मागील वर्षाच्या लेखा परिक्षणाच्या दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
५) सन २०२०-२१ वैधानिक लेखापरिक्षणासाठी मे.बी.एस.कोरडे अँड कंपनी, ठाणे -५ यांच्या नियुक्तीस मंजूरी देणे.
६) सन २०१९-२० च्या अंदाज पत्रकाच्या कमी-जास्त झालेल्या खर्चास मान्यता तसेच सन २०२०-२१ वर्षाच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
७) चिटणीसांची नेमणूक व त्यांचे मानधन ठरविणे.
८) नियंत्रण समिती व तक्रार निवारण समितीची नेमणूक करणे.
९) सन २०२०-२०२१ या वर्षाकरिता अंतर्गत लेखापरिक्षक यांची निवड करणे व मेहेनताना ठरविणे.
१०) सभासदांपैकी अंतर्गत हिशोब तपासणीसांची निवड व मेहनताना ठरविणे.

दिनांक : ०९/१२/२०२०.
कळवा, ठाणे - ४०० ६०५

संचालक मंडाळाच्या आदेशावरुन
**श्री. अमित प्रभाकर ओजाळे**
चिटणीस

## ✤ सभासदांस नम्र सूचना ✤

१) ज्या सभासदांनी समभागांची प्रमाणपत्रे, समभागांचा लाभांश अद्याप नेलेले नसतील, त्यांनी ते कार्यालयातून कार्यालयीन वेळेत घेऊन जाणे, अन्यथा सतत तीन वर्षे लाभांश न नेल्यास, नियमानुसार राखीव निधीत जमा केला जाईल. तसेच आपल्या बदललेल्या पत्त्याची व इमेल आयडी नोंद कार्यालयात करणे जरुरी आहे. म्हणजे संस्थेस पत्रव्यवहार करणे सोयीचे जाईल.

**२) सभासदांनी आपल्या व मित्रपरिवाराच्या जीवनावश्यक वस्तू, औषधे व गृहोपयोगी वस्तूंची खरेदी संस्थेच्या भांडारातून करुन एका जागरुक ग्राहकाचे कर्तव्य पूर्ण करावे व इतर ठिकाणच्या फसव्या योजना व सवलतींच्या मोहाला बळी न पडता फसवणुकीस आळा घालावा.**

**संचालक मंडळाच्या आदेशानुसार**
**श्री. अमित प्रभाकर ओजाळे**
**चिटणीस**

## ✤ थोडक्यात दृष्टीक्षेप ✤

| | |
|---|---|
| १) सभासद | : ७३३८ |
| २) भागभांडवल | : रु. ९६.९० लाख |
| ३) राखीव व इतर निधी | : रु.३२०.६६ लाख |
| ४) वार्षिक उलाढाल | : रु.३६.०५ कोटी |
| ५) खेळते भांडवल | : रु.१०.४९ कोटी |
| ६) शेअर्स लाभांश | : रु. १२ % (मागील ३१ वर्षापासून) |
| ७) ऑडीट वर्ग | : "अ" सुरुवातीपासून |
| ८) खरेदीवरील सूट | : जीवनोपयोगी वस्तू व औषधे खरेदीवर सभासदांस १% व बिगर सभासदांस १/२ %ग्राहक बोनस, छापील किंमतीपेक्षा ५% ते ५०% पर्यंत कमी दर आणि सणासुदीच्यावेळी आकर्षक भेटवस्तू योजना. |
| ९) शैक्षणिक उत्तेजनार्थ | : अहवाल साली सभासदांच्या पाल्यास प्रत्येक वर्गातील गुणानुक्रमाकांनुसार इयत्ता १० वी ते १५वी कला, वाणिज्य, विज्ञान व इतर शाखेतील एकूण ४६ विद्यार्थ्यांस रोख पारितोषिके, सन्मानपत्र व ट्रॉफी देण्यात आली. |
| १०) सामाजिक | : पर्यावरण समतोल राहण्यासाठी वृक्षारोपण, सभासद व कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य शिबिर, तसेच महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ साजरे केले जातात. |

११) मुख्य कार्यालयीन वेळ : सकाळी ९.३० ते १.३० दूपारी २.०० ते ७.००, साप्ताहीक सुट्टी शुक्रवार.

## सहकार बझार-शाखा

**१) स्वयंसेवा कळवा शाखा**
मुख्य कार्यालय, सहकार इमारत, स्टेशन रोड, कळवा, ठाणे-४०० ६०५.
मोबा. : ८२९१९३८०८२

**२) स्वयंसेवा खारीगांव पाखाडी शाखा**
''माऊली'', महानगरपालिका उद्यानाच्या बाजुला, खारीगांव, पाखाडी, ठाणे-४०० ६०५.
मोबा. : ८२९१९३८०८३

**३) डिपार्टमेंटल स्टोअर्स, ऐरोली शाखा**
प्लॉट क्र. ३१ अे, सेक्टर क्र. ५, ऐरोली, नवी मुंबई.
मोबा. : ८६५५०२०१५९

**४) डिपाटमेंटल स्टोअर्स,नेरूळ शाखा**
प्लॉट क्र. २८ सी, सेक्टर क्र. १०, नेरूळ,नवी मुंबई
मोबा. : ८६५५०२०१५३

**५) आनंद विहार खारीगांव शाखा**
आनंद विहार कॉम्प्लेक्स, खारेगांव रेल्वे क्रॉसिंग जवळ,कळवा (पूर्व)
मोबा. ८६५५०२०१५५

**६) स्वयंसेवा विटावा शाखा**
करूणा अपार्टमेंट, विटावा, ठाणे-४०० ६०५.
मोबा. : ८६५५०२०१५४

**७) स्वयंसेवा खारीगांव शाखा-१०**
सावित्री पेरीछाया इमारत, खारीगांव, ठाणे-४०० ६०५.
मोबा. : ८२९१९३८०८६

**८) सहकार मेडिकल आणि जनरल स्टोअर्स**
सहकार इमारत नं. ३, स्टेशन रोड, कळवा, ठाणे-४०० ६०५.
मोबा. : ८२९१९३८०८५

**९) स्वयंसेवा पोस्ट ऑफिस शाखा**
मातृछाया इमारत, ज्ञानप्रसारिणी शाळेसमोर, जुना बेलापूर रोड, कळवा, ठाणे-४०० ६०५.
फोन : ८२९१९३८०८४

**१०) स्वयंसेवा दिघा शाखा**
रविदर्शन इस्टेट, दिघा तलावाजवळ, दिघा, नवी मुंबई
मोबा. : ८६५५०२०१५८

**११) वारणा व गोवर्धन दूध विक्री केंद्रे-दहा**

**१२) स्वस्त धान्य दुकाने-सहा**

**खरेदीसाठी उत्तम ठिकाण - सहकार बझार**

# शहात्तरावा वार्षिक अहवाल
## सन २०१९-२०२०

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

संस्थेच्या सन २०१९-२०२० या वर्षाचा वैधानिक लेखापरिक्षक यांनी प्रमाणित केलेला शहात्तरावा वार्षिक अहवाल तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यातील सन २०२० च्या सुधारणा अध्यादेशानुसार व्यवस्थापक समितीस दिलेल्या अधिकाराप्रमाणे व्यवस्थापक समितीची विशेष सभा बुधवार दि.१६/१२/२०२० रोजी संस्थेच्या मुख्य कार्यालयात आयोजित करण्यात आली. सदर सभेमध्ये वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील होणाऱ्या विषयांना मंजूरी देण्यात येणार आहे.

संस्थेच्या आर्थिक,सामाजिक व शैक्षणिक कामकाजाची नोंद घेऊन महाराष्ट्र शासनाने दिनांक १० सप्टेंबर २०१९ रोजी सहकार निष्ठ पुरस्कार देऊन नाशिक येथे भव्य समारंभात मा.सहकार मंत्र्यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.

अहवाल वर्षात संस्थेचे नगर भूमापन क्र.७२२ ते ७२८ कळवा येथील जागेवर नवीन इमारत बांधकामाचे भूमिपूजन ठाण्याचे मा.महापौर श्री.नरेश म्हस्के यांच्या शुभहस्ते करण्यात आले. तसेच संस्थेतर्फे श्री गाडगे महाराज आश्रम शाळा भातसई, ता.शहापूर येथील पुरग्रस्त अनाथ व गरीब विद्यार्थ्यांसाठी कपडे, भांडी व अन्नधान्याचे वाटप करण्यात आले. तसेच मागील वर्षी ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद पाहून याहीवर्षी दि.१०जानेवारी २०२० ते १९ जानेवारी,२०२० पर्यंत गांवदेवी मैदान,कळवा येथे भव्य तांदूळ महोत्सवाचे मा.पोलिस आयुक्त,ठाणे श्री.विवेक फणसळकर यांचे शुभहस्ते उद्‌घाटन करण्यात आले. या तांदूळ महोत्सवात शंभर पेक्षा अधिक प्रकारचे नवीन व जूने तांदूळ वर्षभराच्या साठवणुकीसाठी स्वस्त दरात ग्राहकांना उपलब्ध झाले.

दिनांक १२/०५/२०२० रोजी संस्थेच्या अमृतमहोत्सवाचा भव्यदिव्य सांगता सोहळा महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री व इतर मंत्रीमहोदयांच्या विशेष उपस्थितीत गडकरी रंगायतन ठाणे येथे आयोजित करावयाचा मानस होता. परंतु अहवाल वर्षअखेरीस संपूर्ण जगावर कोरोना प्रादुर्भावामुळे मोठे सामाजिक व आर्थिक संकट उभे राहील्याने सोशल डिस्टंसिंगचे पालन करुन अत्यंत साधेपणाने संस्थेच्या कार्यालयात सांगता समारंभाच्या दिवशी फक्त दिपप्रज्वलन करण्यात आले.

लॉकडाऊनच्या कठीण काळामध्ये सोशल डिस्टंसिंगचे पालन करुन सर्व जीवनावश्यक किराणामालाची घरपोच सेवा पुरविण्याची परंपरा संस्थेने कायम ठेवली, ही अभिमानस्पद बाब आहे. तसेच संस्थेने सामाजिक बांधिलकीची जाणिव कायम ठेवून मा.श्री.मनिष जोशी, उपआयुक्त, परिमंडळ-१, ठाणे महानगरपालिका यांच्या शुभहस्ते महात्मा फुलेनगर व सहयाद्री विद्यालय कळवा येथील कोविड केअर सेंटरमधील रुग्णांसाठी कोलगेट पेस्ट ५०० नग, ब्रश ५००नग, प्लोअर क्लिनर ५० नग, अँटीसेप्टीक लिक्वीड ५० नग व हँडग्लोज ५० बॉक्सची मदत सुपूर्द केली. तसेच कोविड आरोग्य केंद्र खारीगांव येथील रुग्णांना दिवाळीनिमित्त स्नानासाठी उटणं व सहकार महिला बचत गटाच्या सदस्यांनी बनविलेल्या फराळाचे वाटप करण्यात आले.

अहवाल वर्षात विक्री, व्यापारी नफा व निव्वळ नफ्यामध्ये वाढ झाली असून लॉकडाऊनच्या काळात व अनलॉक (मिशन बिगिन अगेन) च्या सुरुवातीमध्येही सभासद व ग्राहकांनी संस्थेवर विश्वास कायम ठेवला याबाबत समाधान व्यक्त करीत आहे.

### सभासद व भाग भांडवल :-

अहवाल साली सभासद संख्येत ८९ ची वाढ झाल्याने रु. ३,६२,०९०/- भागभांडवल वाढ झाली. तसेच २१ सभासदांनी भागभांडवल परत नेल्याने दि. ३१ मार्च २०२० अखेरीस एकूण ७३३८ सभासदांचे वसूल भागभांडवल रु.९६,९०,२५०/- झाले आहे. दरवर्षी सभासद व भांगभांडवलामध्ये होणाऱ्या वाढीतून संस्थेवरील विश्वास प्रगट होत आहे.

**आम्ही आपणास सहभागी करून घेतो.**

## व्यवहार आणि उलाढाल :-

सन २०१९-२०२० वर्षात एकूण विक्रीत ०.८३ ने वाढ होवून एकूण विक्री रु.३६.०५ कोटी व व्यापारी नफा रु.४.१५ कोटी झाला आहे. मागील वर्षी एकूण विक्री रु.३५.२२ कोटी व व्यापारी नफा रु.३.९८ कोटी झाला होता. सभासदांनी आपली व मित्रपरिवारासाठी संस्थेतून खरेदी करावी व विक्रीवाढीस सहकार्य करावे. ग्राहकांची बचत हेच संस्थेचे ध्येय आहे.

## स्वयंसेवा भाण्डारे :-

अहवाल वर्षात स्वयंसेवा भाण्डारांची एकूण विक्री रु.३२.७३ कोटी झाली आहे. ग्राहक स्वयंसेवा विभागामध्ये क्रेडीट/डेबिट कार्ड, सोडॅक्सो, तिकीट रेस्टॉरंट कार्ड सुविधा व खरेदीवर कंपन्यातर्फे इतर डिस्काऊंटचा लाभ घेत आहेत. तसेच गणपती, दिवाळी, ईद व ख्रिसमस या सणानिमित्ताने ग्राहकांसाठी अनेक सवलत योजना सुरु असतात. त्याचा सभासदांनी लाभ घ्यावा. जीवनावश्यक स्वच्छ व निर्भेळ माल कमीतकमी किंमतीत ग्राहकांनी पुरवठा करणे उद्दीष्टांमुळे बाहेरील बाजारपेठेतील भाववाढीवर अंकूश ठेवण्यास संस्था यशस्वी झाली आहे.

## मेडिकल स्टोअर्स :-

संस्थेच्या मेडिकल स्टोअर्समध्ये औषधांवर कमीत कमी विक्रीदर असल्याने परिसरातील तसेच लांबचे ग्राहक त्याचा लाभ घेत आहेत. अहवालसाली मेडिकल स्टोअर्सची एकूण विक्री रु.२.२९ कोटी इतकी झाली आहे. मेडिकल स्टोअर्स स्थापनेपासून सर्व औषधांवर छापील किंमतीपेक्षा कमी विक्रीदर आकारणारे महाराष्ट्रातील एकमेव औषधी भांडार म्हणून संस्थेचा नांवलौकीक आहे.संस्थेचे मेडीकल स्टोअर्स संस्थेच्या नवीन इमारतीमध्ये लवकरच मोठया जागेत स्थलांतरीत करुन ग्राहकांना अधिक चांगल्या पद्धतीची सेवा देण्याचा प्रयत्न करणार आहोत.

## दूध विभाग :-

संस्था वारणा, व गोवर्धन दूध संघाचे दूध व दूग्धपदार्थ विक्री करीत आहे. अहवाल वर्षात दूधाची विक्री रु. ७५.१३ लाख झाली असून निव्वळ नफा रु.२.१६ लाख इतका झाला आहे. सभासदांना विनंती करण्यात येते की, स्वच्छ व निर्भेळ दूधासाठी संस्थेतून कमी दरात खरेदी करुन आपली बचत करावी.

## शिधावाटप विभाग :-

मागील वर्षी शिधावाटप विभागाची विक्री रु.४९.३३ लाख होती व नफा रु.६.४२ लाख होता. अहवाल वर्षात शिधावाटप विभागाची विक्री रु.२८.०६ लाख व निव्वळ नफा रु.३.८४ लाख झाला आहे.

## अंतर्गत हिशोब तपासनीस :-

संस्थेचे दप्तरी हिशोब स्वयंप्रेरणेतून सभासदांमधून नियुक्त झालेले सदस्य हिशोब तपासणी करीत असतात. अहवालासाली एकूण २५ सभासदांची हिशोब तपासनीस म्हणून निवड करण्यात आली होती. त्यापैकी बहुतांशी हिशोब तपासनीसांनी आपल्यावर सोपविलेली कामाची जबाबदारी पूर्ण केली आहे.

**आम्ही आपणास सहभागी करून घेतो.**

## नफा वाटणी : -

संस्थेस दि. ३१ मार्च २०२० अखेर निव्वळ नफा रु. ३८,४५,४५२.९५ झाला असून, त्यामध्ये मागील वर्षाचा शिल्लक नफा रु.१२२०.६८ मिळून नफा वाटणीस रु. ३८,४६,६७३.६३ एवढी रक्कम राहते. सदर नफा विभागणीची शिफारस संचालक मंडळाने पुढीलप्रमाणे केली असून, ती आपणापुढे मंजूरीसाठी ठेवली आहे.

| | | |
|---|---|---|
| **एकूण नफा** | **रु.** | **३८,४६,६७३.६३** |
| राखीव निधी २५% | रु. | ९,६१,७००.०० |
| शेअर्स लाभांश १२% | रु. | ११,३९,१००.०० |
| धर्मादाय निधी १% | रु. | ३८,५००.०० |
| लाभांश समकरण निधी २% | रु. | ७६,९५०.०० |
| अधिलाभांश समकरण निधी ५% | रु. | १,९२,३५०.०० |
| तारण किंमत चढउतार निधी १% | रु. | ३८,५००.०० |
| वरील वाटप रु. २४,४७,१००.००<br>उर्वरीत नफा वाटप रु. १३,९९,५७३.६३ | | |
| इमारत निधी | रु. | ७,७४,०००.०० |
| विशेष विकास निधी ५% | रु. | ७०,०००.०० |
| सभासद कल्याण निधी ५% | रु. | ७०,०००.०० |
| स्पेशल इमर्जन्सी निधी ५% | रु. | ७०,०००.०० |
| गरजांमध्ये बदल करणेबाबत १०% | रु. | १,४०,०००.०० |
| ग्राहक अधिलाभांश निधी १५% | रु. | २,१०,०००.०० |
| मेहनताना | रु. | ६५,०००.०० |
| पुढील वर्षाकरिता शिल्लक नफा | रु. | ५७३.६३ |
| **एकूण नफा** | **रु.** | **३८,४६,६७३.६३** |

## लेखापरिक्षण :-

संस्थेचे सन २०१९-२०२० या वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण मे.एन.एस.गोखले अँड कंपनी, चार्टर्ड अकौंटंट ठाणे यांनी पूर्ण केले असून लेखापरिक्षण वर्ग "अ" कायम केला आहे व कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले आहे. सन २०१९-२०२० या वर्षाचे अंतर्गत लेखापरिक्षण श्री.सुरेश आर.बारी प्रमाणित लेखापरिक्षक यांनी पूर्ण केले असून संस्थेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले आहे.

## विद्यार्थी गुणगौरव :-

संस्थेच्या शैक्षणिक उपक्रमामध्ये सभासदांच्यापाल्यांना व कर्मचाऱ्यांच्या प्रोत्साहन देण्यासाठी पारितोषिके देत असते. अहवालवर्षी इयत्ता १० वी ते १५ वी पर्यंत कला, वाणिज्य, विज्ञान व इतर शाखेतील एकूण ४६ विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके, सन्मानपत्र व ट्रॉफी देण्यात आली. दरवर्षी सभासद व पाल्यं या गुणगौरव समारंभात आनंदाने सहभागी होत असतात.

मालाची उत्तम प्रत, अचूक वजन व छापील किंमतीपेक्षा कमी दर.

## नियंत्रण समिती :-

नियंत्रण समितीचे संस्थेच्या कारभारावर नेहमीच लक्ष असते. नियंत्रण समितीच्या एकूण १५ सभा झाल्या. सदर सभांना सभासदांची उपस्थिती चांगली होती.

## संचालक मंडळ :-

संस्थेच्या प्रगतीमध्ये संचालक मंडळाचा सिंहाचा वाटा आहे. अहवाल वर्षात एकूण १७ सभा झाल्या. सर्व सभांना संचालकांची उपस्थिती चांगली होती. तसेच सभेमध्ये सर्व निर्णय एकमताने घेण्यात आले.

संस्थेचा व्यवहार दिवसेंदिवस वाढत असून, दैनंदिन व्यवहार कायदेशीर व सुरळीत चालण्यासाठी योग्य वेळी योग्य निर्णय घेणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठी मला व्हा.चेअरमन श्री.रामदास भोईर व चिटणीस श्री. अमित ओजाळे यांचेही चांगले सहकार्य लाभले

## तक्रार निवारण समिती :-

तक्रार निवारण समितीच्या तीन सभा झाल्या. तक्रार निवारण समितीपुढे कोणतीही तक्रार आलेली नाही.

## कर्मचारी वर्ग :-

संस्थेच्या प्रगतीमध्ये कळवा मध्यवर्ती ग्राहक सहकारी कर्मचारी संघटनेचे व कर्मचारी वर्गाचे मोलाचे योगदान आवश्यक आहे. संस्था त्यांच्या दैनंदिन कामकाजामध्ये कार्यक्षमता वाढविण्यासाठी प्रशिक्षण देण्यासाठी प्रयत्नशील असते. संस्थेने अहवाल सालात कर्मचा-यांना डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी प्रबंध संस्थान पुणे येथे विविध विषयांवरील प्रशिक्षणास पाठविण्यात आले होते. तसेच संस्था मागील आठ वर्षांपासून कायम कर्मचा-यांसाठी इन्शुरन्स कंपनीकडून अपघात विमा पॉलिसी घेत असून, यावर्षीही प्रती कर्मचारी रु ५,००,०००/- चा वीमा घेऊन त्याचा हप्ता टाटा ए.आय.जी.इन्शुरेन्स कंपनीकडे संस्थेने भरणा केलेला आहे.

## श्रध्दांजली :-

संस्थेचे संचालक श्री.पांडुरंग बाबु लोखंडे यांचे दि. ०९/०८/२०२० रोजी, संचालिका श्रीमती. कांचन पांडुरंग गौरी यांचे दि ०१/१२/२०२० रोजी व अंतर्गत हिशेब तपासणीस श्री. विजय रामचंद्र बळेल यांचे दि. ०१/११/२०१९ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या स्मृतीस आदरांजली अर्पण करतो. तसेच अहवाल वर्षात दिवंगत झालेले, हितचिंतक व शहिद झालेल्या भारतीय जवानांना संस्थेच्या वतीने त्यांच्या स्मृतीस विनम्रपूर्वक अभिवादन करुन भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

## आभार व समारोप :-

ठाणे भूषण व सहकार महर्षी स्वर्गीय मा.दादासाहेब तथा कै.गोपीनाथ शिवराम पाटील यांनी आखून दिलेली सहकाराची मूलभूत तत्वे डोळ्यांसमोर ठेवून संस्थेची यशस्वी वाटचाल सुरु आहे.

संस्थेच्या दैनंदिन कामकाजात व वाटचालीत अनेकांचे सहकार्य लाभले. स्थानिक आमदार, मा. सहकार आयुक्त, पुणे, मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई, मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे शहर, ठाणे तसेच महानगरपालिकेचे मा. महापौर, विरोधी पक्षनेते, सभागृह नेते व मा. उपमहापौर, मा. नगरसेवक, वित्तीय संस्था या सर्वांचे अधिकारी व सेवकवर्ग, संस्थेचे वैधानिक लेखापरिक्षक मे. एन.एस.गोखले अँड कंपनी, चार्टर्ड अकौंटंट ठाणे, अंतर्गत लेखापरिक्षक श्री.सुरेश.आर.बारी, सभासद सहकारी संस्था, संस्थेचे सभासद व ग्राहक या सर्वांचे सहकार्य लाभले. त्या सर्वांनी केलेले सहकार्य मोलाचे आहे. त्याबद्दल या सर्वांचे आभार मानीत आहे.

संस्थेच्या शहात्तर वर्षांच्या प्रगतीत व यशस्वी वाटचालीत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष आपले सर्वांचे सहकार्य आहे ते असेच वृध्दींगत व्हावे, ही इच्छा व्यक्त करुन हा अहवाल पूर्ण करीत आहे.

जयहिंद!! जय सहकार!! जय महाराष्ट्र!!

आपला नम्र

**श्री. नारायण गजानन गावंड**

चेअरमन

कळवा मध्य. ग्राहक सह. संस्था मर्यादित, कळवा, ठाणे

घरपोच यांद्यांची सुविधा, फोन वरून ऑर्डर स्विकारल्या जातील.

## सहकार बझार

### कळवा मध्यवर्ती ग्राहक सहकारी संस्था मर्यादित,
### कळवा, ठाणे - ४०० ६०५
### * शाखावार माहिती *
### सन २०१९ - २०२०

| अ. क्र. | शाखा | शाखा सुरु किंवा रुपांतर | विक्रीची जागा (चौ. फुटात) | कर्मचारी | विक्री रु.लाख | व्यापारी नफा रु.लाख | व्यापारी नफ्याचे विक्रीशी प्रमाण | शिल्लक माल रु. लाख | स्टॉक रोटेशन | दैनंदिन विक्री रु. लाख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | स्वयंसेवा कळवा शाखा<br>नवीन वास्तूत स्थलांतर | १०.१२.१९८८<br>१५.०३.२०११ | १८०० | ३३ | ११९६.५९ | १४६.३४ | १२.२६ | ७३.१६ | १६ | ३.८९ |
| २) | स्वयंसेवा - २ खारीगाव शाखा | ०४.०४.१९९२ | ८०० | १९ | ५८२.८६ | ६८.३८ | ११.७६ | ११.५० | ३५ | १.८९ |
| ३) | स्वयंसेवा भुसारआळी शाखा | १०.१२.१९९२ | ५२० | ४ | ९३.२६ | ९.२८ | ९.९६ | ९.०१ | १२ | ०.३० |
| ४) | स्वयंसेवा ऐरोली शाखा | २४.०२.१९९६ | १४०० | १० | २७०.७५ | २८.६९ | १०.६७ | २२.२७ | १० | ०.८८ |
| ५) | स्वयंसेवा नेरुळ शाखा | २२.१०.२००० | २३०० | २ | २६३.४७ | २३.८६ | ९.०६ | १५.५१ | १४ | ०.८६ |
| ६) | सहकार मेडिकल, कळवा | १२.०५.१९९४ | ३०० | ७ | २२९.०७ | ३१.१० | १३.५८ | २३.७० | १० | ०.७५ |
| ७) | शिधावाटप विभाग (सहा) | १९४६-१९४७ | १३६० | २ | २८.०६ | ५.३१ | १९.३६ | ५.२३ | ५ | ०.०९ |
| ८) | दुध विभाग | १९६९-१९७० | ४०० | १ | ७५.१३ | २.८५ | ३.७९ | - | ३६५ | ०.२१ |
| ९) | स्वयंसेवा विटावा शाखा | ३०.०५.२००४ | ७५० | ९ | ३०८.५२ | ३५.८६ | ११.६५ | ७.७३ | २९ | १.०० |
| १०) | स्वयंसेवा दिघा शाखा | ०५.१२.२०१४ | १५०० | ९ | २३७.५१ | २८.०१ | ११.८० | ७.७० | १९ | ०.७७ |
| ११) | स्वयंसेवा-१० खारीगांव शाखा | ११.१०.२००५ | १३०० | ८ | १२८.२२ | १४.५० | ११.३४ | ८.१५ | १६ | ०.४२ |
| १२) | पोस्ट ऑफिस शाखा | ०१.१०.२००९ | ४०० | ७ | १०४.०१ | ११.६७ | ११.२३ | ३.२८ | २३ | ०.३४ |
| १३) | स्वयंसेवा खारीगांव<br>आनंद विहार शाखा-१२ | ०७.०९.२०१५ | ३४२ | ४ | ८७.८० | १०.०६ | ११.४६ | ४.७५ | १५ | ०.२९ |
| १४) | आर्यावर्त गोडावून | ०८.०९.१९९२ | ८०० | - | -- | -- | -- | -- | -- | -- |
| १५) | मुख्य कार्यालय | -- | १८०० | २१ | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | | एकूण | १५७७२ | १३५ | ३६०५.२५ | ४१५.९ | -- | १९१.९९ | -- | ११.६९ |

वार्षिक खरेदीवर ग्राहक बोनस व सणासुदीनिमित्त आकर्षक भेटवस्तू.



संस्थेच्या तांदूळ महोत्सवात विविध तांदळाचे नमुने परिक्षण करताना मा.श्री.विवेक फणसळकर, पोलिस आयुक्त, ठाणे यांचेसोबत मा.चेअरमन श्री.नारायण गावंड व इतर मान्यवर.




डॉ.विठ्ठलराव विखे पाटील सहकारी प्रबंध संस्थान, पुणे यांचेतर्फे आयोजित ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी संस्थेच्या मुख्य कार्यालयातील अधिकारी वर्ग.

## सहकार बझार

## कळवा मध्यवर्ती ग्राहक सहकारी संस्था मर्यादित, कळवा, ठाणे - ४०० ६०५

### * प्रगती दृष्टिक्षेप * सन २०१० - २०११ ते २०१९ - २०२०

| वर्ष | सभासद संख्या | भाग भांडवल ₹ लाख | खेळते भांडवल ₹ लाख | एकूण विक्री ₹ लाख | व्यापारी नफा ₹ लाख | निव्वळ नफा ₹ लाख | ऑडिट वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१०–२०११ | ६९२१ | ६४.७१ | ५६६.९९ | २४१२.२४ | २५३.४० | १८.५७ | ''अ'' |
| २०११–२०१२ | ६९६४ | ६६.९७ | ५७८.९३ | २७३८.५० | २७४.४२ | १८.८३ | ''अ'' |
| २०१२–२०१३ | ७००० | ७२.८१ | ५८७.४१ | २८५१.१५ | २८३.५९ | २०.२३ | ''अ'' |
| २०१३–२०१४ | ७०५८ | ७५.०७ | ६१३.६१ | ३१०२.४८ | ३०९.९६ | २२.१५ | ''अ'' |
| २०१४–२०१५ | ७०९६ | ७४.६० | ६५७.९० | ३१३७.२८ | ३३९.४९ | ३१.४१ | ''अ'' |
| २०१५–२०१६ | ७१६७ | ८१.७८ | ७२६.०१ | ३३४१.४८ | ३५९.८८ | ३१.९० | ''अ'' |
| २०१६–२०१७ | ७२०७ | ८८.५४ | ८०२.१८ | ३५०७.५० | ३८९.२४ | ४०.०१ | ''अ'' |
| २०१७–२०१८ | ७२२५ | ९०.०६ | ८९६.९४ | ३४१६.२९ | ३८६.७९ | ४२.९७ | ''अ'' |
| २०१८–२०१९ | ७२७० | ९४.०३ | ९७४.९१ | ३५२१.८५ | ३९८.३८ | ३८.३६ | ''अ'' |
| २०१९–२०२० | ७३३८ | ९६.९० | १०४९.४४ | ३६०५.२५ | ४१५.९१ | ३८.४५ | ''अ'' |

**योग्य किंमतीची हमी-उत्तम सेवा.**

## व्यापारी पत्रक व नफा-तोटा पत्रक दि. ०१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२० अखेरचे

| दि. ३१ मार्च २०१९ | खर्च तपशील | | दि. ३१ मार्च २०२० |
|---|---|---|---|
| रु. पैसे | | | रु. पैसे |
| १९५८७५२४.०१ | सुरुवातीचा शि. माल व बारदान | | २४३०६४२१.९३ |
| ३१४३०४९२९.१२ | खरेदी | | ३१११०६३८२.०० |
| १५१८११४.४७ | पॅकींग मटेरियल | | १९५४३०१.६९ |
| ११७७८४९.९७ | गाडी भाडे जकात व इतर | | ११७२१६०.०० |
| ६४७२२.२० | लेबल स्टेशनरी | | ७३५०.०० |
| ३९८३८२४९.६७ | व्यापारी नफा | | ४१५९१५५७.५६ |
| **३७६४९१३८९.४४** | **बेरीज** | | **३८०१३८१७३.१८** |
| | **दिलेले व्याज** | | |
| १०६१०७०.०० | बँक कर्ज, डिपॉ, ठेवी व इतर | | ९५२५४३.५० |
| | **पगार, भत्ते व इतर** | | |
| १६७६६६१७.०० | सेवक पगार | १७०२४६००.०० | |
| ३३८६६३२.४८ | सेवक बोनस व सानुग्रह अनुदान | २८३०६१८.१२ | |
| १५५३१९४.०० | सेवक भविष्य निधी अंशदान व चार्जेस | १६७८१२८.०० | |
| | सेवक प्रोत्साहन भत्ता (कोविड-१९) | १८९५१४.०० | |
| ५५४८०.०० | सेवक दिवाळी भेट | ५७२१२.०० | |
| ७५१७५८.०० | सेवक राज्य विमा योजना | ५८६१६४.०० | |
| १२८४७०.०० | सेवक गणवेश | २०८३३.७२ | |
| १०१०२.५० | सेवक वैद्यकीय मदत | २५८०.०० | |
| ९१०८.०० | महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ | ९२७३.४४ | |
| ८८१७१.०० | सभासद व सेवक प्रशिक्षण खर्च | १५३२९.०० | २२४१४२५२.२८ |
| **१२११२५.००** | **संचालक उपस्थिती** | | १३१२५०.०० |
| | **टपाल, छपाई व लेखन सामुग्री** | | |
| ६६४०.०० | पोस्टेज | १३५७२.०० | |
| ४५१२२८.३६ | छपाई व लेखन सामुग्री | ५०१८०६.९४ | ५१५३७८.९४ |
| | **भाडे, कर, फी व वीज बत्ती** | | |
| २०२९२२७.०० | दुकान जागा भाडे | २६५५१७३.०० | |
| ७२१५९८.७५ | कर इमारत व वाहन | ६९०४२७.०० | |
| २५००.०० | व्यवसाय कर | २५००.०० | |
| १९७३२४.०० | विक्रीकर | २४०३७१.०० | |
| १५६९३०.३० | लायसेन्स व रिनीव्हल | ८१९३४.९० | |
| २०००००.०० | ऑडिट फी | २०००००.०० | |
| ०.०० | कायदेविषयक व सल्लागार फी | ५००००.०० | |
| ५२६०९.०० | पाणी बिल | १०४४१२.०० | |
| २६८२०३१.०० | इलेक्ट्रीसिटी चार्जेस | २५८१७४०.०० | |
| ५९६३२७.३२ | सर्व्हीस चार्जेस | ६९४३२७.२२ | |
| १४५८६७.७० | टेलीफोन चार्जेस | १३१५३८.२२ | |
| २४३९६१.०० | विमा | २४२४१०.६५ | ७६७४८३३.९९ |
| ३१४१७९७२.४१ | पुढील पानावर | | ३१६८८२५८.७१ |

**ग्राहक सेवा हिच ईश्वर सेवा.**

## व्यापारी पत्रक व नफा-तोटा पत्रक दि. ०१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२० अखेरचे

| दि. ३१ मार्च २०१९ | जमा तपशील | दि. ३१ मार्च २०२० |
|---|---|---|
| रु. पैसे | | रु. पैसे |
| ३५१२४९६४८.६४ | विक्री | ३५९६९७०२८.४६ |
| ९३५३१८.८७ | रिकामे बारदान व डबे व इतर जमा | ८२८३६६.८३ |
| २४३०६४२१.९३ | अखेर शिल्लक माल व बारदान | १९१९८७०७.७६ |
| — | ऐरोली मेडिकल स्टॉक | ४१४०७०.१३ |
| ३७६४९१३८९.४४ | बेरीज | ३८०१३८१७३.१८ |
| ३९८३८२४९.६७ | व्यापारी नफा | ४१५९१५५७.५६ |
| २५८८७७८.०० | ठेवीवरील मिळालेले व्याज | २७९९१०६.०० |
| ३०१८६६५.०४ | इमारत भाडे | २६२४३६४.९० |
| ३८४७२९२.३९ | इतर जमा | ३१५१०४९.९८ |
| ९७५०.०० | शेअर्स लाभांश | ९७५०.०० |
| — | प्रचार व जाहिरात | ५०५३३०.१० |
| — | सहकार निष्ठ पुरस्कार | २५०००.०० |
| ४९३०२७३५.१० | पुढील पानावर... | ५०७०६१५८.५४ |

कोणत्याही प्रकारची फसवेगिरी नाही किंवा फसवी जाहिरात नाही

## व्यापारी पत्रक व नफा-तोटा पत्रक दि. ०१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२० अखेरचे

| दि. ३१ मार्च २०१९ | खर्च तपशील | | दि. ३१ मार्च २०२० |
|---|---|---|---|
| रु. पैसे | | | रु. पैसे |
| ३१४१७९७२.४१ | मागील पानावरुन.... | | ३१६८८२५८.७१ |
| | **सर्वसाधारण व इतर खर्च** | | |
| १६३४०.०० | इमारत दुरुस्ती | २७०७५.०० | |
| ८१६९५.३८ | इलेक्ट्रिसिटी दुरुस्ती | ७६७४७.२६ | |
| १३५६१९.६२ | डेडस्टॉक दुरुस्ती | १३१७६८.८८ | |
| ४२७७३५७.३० | कार्यालयीन खर्च | ३६३४८८६.७६ | |
| ७०५५०५.६४ | किरकोळ खर्च | ४८१७३५.५२ | |
| ६७८७२.०० | प्रवास खर्च | ५१३७८.०० | |
| ३८९८१३.७४ | वाहन खर्च व दुरुस्ती | ४२४९७५.२८ | |
| २७३२५९.९० | जाहिरात खर्च | — | |
| १६२५८३.२० | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | १८६०९७.१७ | |
| ७४१७७१.२० | ग्राहक सूट | ६२०८८६.९७ | |
| ५४४५७.९६ | दूध विक्री वरील खर्च | ५९००३.३० | |
| ३५००.०० | दूध व्यवस्थापन खर्च | ६०००.०० | |
| ६९४१५.०० | सभा समारंभ, वर्धापन दिन रोषणाई | १३४७१५.५० | |
| ४९९७५.०० | कायदेविषयक खर्च | ५७१५९.०० | |
| ४८१४१४.३९ | एक्सिस व ICICI बँक विक्रीवरील खर्च | ६५०६१०.६५ | |
| १८७१६५.७३ | एक्सिस व ICICI बँक सर्व्हिस टॅक्स | २३२६५३.३२ | |
| ४१९५३.०० | किराणा खरेदीवरील खर्च | ५४०६२.०० | |
| १८००००.०० | Contractual Payment | १२४८३३.०० | ६९५४५८७.६१ |
| १०५००००.०० | आयकर (तरतुद) | | ७५००००.०० |
| ८३००००.०० | ग्रॅच्युएटी (तरतुद) | | ७६५३५९.०० |
| १३७५०५०.०० | वस्तू व सेवाकर (G.S.T.) | | २४९०९००.०० |
| २५१८६६.०० | ऐरोली कमिशन | | ६८११३७.०० |
| — | पंजाब अँड महाराष्ट्र FD(Partial Provision) | | ५०००००.०० |
| — | अमृत महोत्सव खर्च | | ६०५४८२.३४ |
| | **घसारा** | | |
| १०५०४८५.०० | इमारत | १०१६४१६.०० | |
| १०७१००८.०० | डेडस्टॉक, मशिनरी व वाहन | ९०७७१८.९३ | |
| ६९२.०० | लायब्ररी | ८४६.०० | १९२४९८०.९३ |
| ५०००००.०० | सोसायटी अमृत महोत्सव सोहळा (तरतूद) | | ५०००००.०० |
| ३८३५९६२.६३ | **निव्वळ नफा** | | ३८४५४५२.९५ |
| ४९३०२७३५.१० | एकूण बेरीज | | ५०७०६१५८.५४ |

अहवालाच्या शेऱ्यास पात्र राहून

ठिकाण : कळवा, ठाणे
दिनांक : ०८.१२.२०२०

एन.एस.गोखले अॅन्ड कंपनी (चार्टर्ड अकौटंट)
वैधानिक लेखापरीक्षक.
श्री.अभय सिध्देय (पार्टनर)
मे.नं : 033522, फर्म रजि.नं:103270W
को.ऑ.ईएमपॅनल न : 16447
UDIN -20033522AAAACF4222

श्री. सुरेश आर. बारी
अंतर्गत लेखापरीक्षक, कळवा ठाणे.
पॅनल क्रमांक :– सी–१–१७४८५


ग्राहकांसाठी क्रेडिट/डेबिट कार्ड सुविधा उपलब्ध.

## व्यापारी पत्रक व नफा-तोटा पत्रक दि. ०१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०20 अखेरचे

| दि. ३१ मार्च २०१९ | जमा तपशील | दि. ३१ मार्च २०20 |
|---|---|---|
| रु. पैसे | | रु. पैसे |
| ४९३०२७३५.१० | मागील पानावरुन | ५०७०६१५८.५४ |
| ४९३०२७३५.१० | एकूण बेरीज | ५०७०६१५८.५४ |

| श्री. अ. प्र. ओजाळे | श्री. रा. न. भोईर | श्री. नारायण ग. गावंड |
|---|---|---|
| चिटणीस | व्हा. चेअरमन | चेअरमन |

आपल्या पैशांचा पूर्ण मोबदला.

## ताळेबंद पत्रक दि. ३१ मार्च २०२० अखेर

| दि. ३१ मार्च २०१९ रु. पैसे | भांडवल व देणी | पोट रक्कम रु. पैसे | दि. ३१ मार्च २०२० रु. पैसे |
|---|---|---|---|
| | **अधिकृत भाग भांडवल** | | |
| १,५०,००,०००.०० | प्रत्येकी ₹. १०/- चे १५,००,००० भाग | | १,५०,००,०००.०० |
| | **वसुल भाग भांडवल** | | |
| ९३९६२६०.०० | १) अ वर्ग, वैयक्तिक सभासद | ९६८३०८०.०० | |
| ७,१७०.०० | २) ब वर्ग, सहकारी संस्था | ७,१७०.०० | ९६९०२५०.०० |
| | **राखीव व इतर निधी** | | |
| १२२७९५२५.५९ | राखीव निधी | १३२३८७१४.५९ | |
| १२४४३०२९.७१ | इमारत निधी | १३२३८०२९.७१ | |
| ४५५३४५.४५ | धर्मदाय निधी | ४४४९७०.५६ | |
| ८७४८७९.०५ | लाभांश समकरण निधी | ९५१६७९.०५ | |
| ७७७३८४.२२ | अधिलाभांश समकरण निधी | ९६९२३४.२२ | |
| ७७१९६६.२९ | चढउतार निधी | ८१०३६६.२९ | |
| ३५२१४९.५८ | सभासद कल्याण निधी | ३९२५१९.५८ | |
| ५०९०४७.५० | विशेष विकास निधी | ५८०८४७.५० | |
| ६२८६५२.८४ | स्पेशल इमर्जन्सी निधी | ७००४५२.८४ | |
| ५९६५००.०० | गरजांमध्ये बदल निधी | ७४०१००.०० | ३२०६६९१४.३४ |
| | **ठेवी** | | |
| ९६७९०००.०० | सभासद मुदत ठेव | | ९४३४०००.०० |
| | **डिपॉझिट व अनामत** | | |
| ६८२९२२.०० | सेवक सिक्युरिटी | ८०५०७२.०० | |
| ४५४५५.०० | दूध विक्री अनामत | ४५४५५.०० | |
| ९,०००.०० | जागा भाडे डिपॉझिट (अनामत) | ९,०००.०० | |
| ३८८९१६९.०० | डिपॉझिट जमा (अनामत) | ३९१३६६९.०० | ४७,७३,१९६.०० |
| ४०९१०१.०२ | **मागनी न केलेला लाभांश** | | ६,२०,३१५.२२ |
| ५३८०६५५७.२५ | बेरीज पुढील पानावर... | | ५६५८४६७५.५६ |

गृहिणींची प्रथम पसंती-सहकार बझार.

## ताळेबंद पत्रक दि. ३१ मार्च २०२० अखेर

| दि. ३१ मार्च २०१९ रु. पैसे | मालमत्ता व येणी | पोट रक्कम रु. पैसे | दि. ३१ मार्च २०२० रु. पैसे |
|---|---|---|---|
| | **रोख व बँकेतील शिल्लक** | | |
| १३५०४२८.५६ | हातातील रोख शिल्लक | १२१५६७३.८३ | |
| ९०३७.४२ | ठाणे जि.म.स.बँक लि.(सेव्हिंग्ज) | ९३५७.४२ | |
| ४८००६.३२ | ठाणे जि.म.स.बँक लि.(करंट) | ८७७९.३२ | |
| ६४९६८५.२४ | जी.पी. पारसिक बँक लि. कळवा शाखा | ३९७१२७८.०६ | |
| ४६०२५.६६ | जी.पी. पारसिक बँक लि. खारीगांव शाखा | ३१६८४.६६ | |
| ३८२९१.३२ | जी.पी. पारसिक बँक लि.. ऐरोली शाखा | ४३९३१.३२ | |
| १३८५६१.२१ | ठाणे जि.म.स.बँक लि. ओ.डी. | ६९२९८५५.१५ | |
| ५२६१०.२० | जी.पी. पारसिक बँक लि. नेरूळ शाखा | ४३७७३९.७० | |
| १३१२९.०७ | बँक ऑफ इंडिया, कळवा शाखा | १९०४५.०३ | |
| ९००५१.१३ | ॲक्सिस बँक | १९३३२.२५ | |
| १३८५०.०० | जी.पी. पारसिक बँक लि. खारीगांव शाखा-१० | १३८५०.०० | |
| ८८६.०० | ठाणे जि.म.स.बँक लि.(हायपोथिकेशन) | — | |
| ४७९००९.२० | आय सी आय सी आय बँक खाते | ५६३७३९.१० | |
| ८८८१२.७४ | जी.पी. पारसिक बँक लि. ऐरोली मेडिकल | ८८६९४.७४ | १३३५२९६०.५८ |
| | **गुंतवणूक** | | |
| ६००००.०० | ठाणे जि.म.स.बँक लि. (भाग) | ६००००.०० | |
| ५००.०० | समर्थ को-ऑ कन्झ्यु. सेन्ट्र. स्टो. | ५००.०० | |
| २५०.०० | आर्यावर्त को.ऑप.हौ.सोसा (भाग) | २५०.०० | |
| २५०.०० | निसर्ग को.ऑप.हौ.सोसा (भाग) | २५०.०० | |
| २५०.०० | श्री. सुदाम को.ऑप.हौ.सोसा. (भाग) | २५०.०० | |
| ९६०९६१७.०० | ठाणे जि.म.स.बँक.लि(मु.ठेव) | ७२७६५८०.०० | |
| ३२६७१९२.०० | ठाणे जि.म.स.बँक.लि(राखीव निधी) | ३३०५६३९.०० | |
| १७१९८८.०० | ठाणे जि.म.स.बँक.लि(मु.ठेव)(भा.भा.वि.वि.) | १७१९८८.०० | |
| २५०००.०० | महा स्टेट केमिस्ट अँड ड्रगिस्ट | २५०००.०० | |
| ४०००००.०० | जी.पी. पारसिक बँक लि.(ग्रॅच्युईटी) | ४०००००.०० | |
| १७८१७९१७.०० | जी.पी. पारसिक बँक लि.(मुदत ठेव) | २१८१०७२८.०० | |
| ५०००.०० | महा स्टेट को-ऑप.कं. फेडरेशन | ५०००.०० | |
| ५००.०० | सावित्री पेरी छाया हौसिंग सोसायटी (भाग) | ५००.०० | |
| १६५३९५२.०० | पंजाब ॲण्ड महाराष्ट्र को.ऑ.बँक लि.(मुदत ठेव) | २१५६३३४.०० | ३५२१३०१९.०० |
| | **डिपॉझिट** | | |
| ३२५००.०० | लायसेन्स व सिक्युरिटी | ३२५००.०० | |
| ४२०४२.०० | टेलिफोन | ४२०४२.०० | |
| २९२६४५.०० | इलेक्ट्रिक मीटर | ३१४९५५.०० | |
| ३८४००.०० | पाणी मीटर | ३८४००.०० | |
| ५११९९६.०० | दुकान जागा भाडे | ६५९९९६.०० | |
| ७५०००.०० | श्री.वारणा स.दू.उ.प्र.स. मर्यादित | ७५०००.०० | |
| १५०००.०० | शिवामृत दूध उत्पादक संघ लि. | १५०००.०० | |
| ४९०५.०० | सिटी इंडस्ट्रीज डेव्हलपेंट कार्पोरेशन | ४९०५.०० | |
| ३००००.०० | हॉल भाडे डिपॉझिट | ३००००.०० | |
| १२८००.०० | नवी मुंबई महानगरपालिका | १२८००.०० | १२२५५९८.०० |
| ३७०९४०८८.०७ | बेरीज पुढील पानावर... | | ४९७९१५७७.५८ |

सर्व औषधांवर १५% पर्यंत सवलत देणारी महाराष्ट्रातील प्रमुख संस्था

## ताळेबंद पत्रक दि. ३१ मार्च २०२० अखेर

| दि. ३१ मार्च २०१९ रु. पैसे | भांडवल व देणी | पोट रक्कम रु. पैसे | दि. ३१ मार्च २०२० रु. पैसे |
|---|---|---|---|
| ५३८०६५५७.२५ | **मागील पानावरुन** | | ५६५८४६७५.५६ |
| | **इतर देणी** | | |
| २५५४९६९८.६७ | व्यापारी देणी | २७३५४४३८.०१ | |
| १४४२४३३.५१ | किरकोळ देणी | १५२४६५०.६० | २८८७९०८८.६१ |
| | **देणी व तरतूदी** | | |
| २३३४३५.०० | ऑडिट फी | ३०६३१७.०० | |
| ३६२१७५७.६० | सेवक बोनस व सानुग्रह अनुदान | ३०७३७०३.७२ | |
| ४०५७८४.३१ | कन्झुमर्स बोनस | ४५७१५०.७२ | |
| ३२६५००.०० | कायदेविषयक व सल्लागार फी | ९६५००.०० | |
| ०.०० | कमिशन ऐरोली शाखा देणे | १५१४३८.०० | |
| ०.०० | प्रोत्साहन भत्ता देणे (कोविड-१९) | १८९५१४.०० | |
| ४४७७०००.०० | आयकर तरतूद | ५२२७०००.०० | |
| १२८०००.०० | विक्रीकर देणे | १००२१४.०० | |
| ४११८६६.०० | एफ.डी व्याज देणे | ३४७७१५.५० | |
| ४५७००९.०० | शॉप रेन्ट देणे | ८८८५०८.०० | |
| ११२०७.४२ | टेलिफोन चार्जेस देणे | १०६२७.४३ | |
| १७०००.०० | गाडी भाडे व हमाली देणे | १७०००.०० | |
| २७२४५४.९० | इलेक्ट्रीसिटी चार्जेस देणे | ३२१४८२.९० | |
| २७०३१.०० | क़िराणा खरेदी चार्जेस देणे | ४५०००.०० | |
| ५०८५.०० | पाणी चार्जेस देणे | ८७८०.०० | |
| ५०००००.०० | एल.आय.सी. ग्रुप ग्रच्युईटी | ७५००००.०० | |
| १५०००००.०० | सोसायटी अमृत महोत्सव सोहळा | २००००००.०० | |
| ४६२,०३२.०९ | वस्तू व सेवाकर देणे | १०४४१०५.५६ | |
| ०.०० | पंजाब व महाराष्ट्र बँक | ५०००००.०० | १५५३५०५६.८३ |
| | **इतर येणी** | | |
| — | ॲडव्हास व अनामत | | ८५९११.२५ |
| — | क्रेडिट कार्ड | | १३०४७.३७ |
| | **नफा-तोटा :-** | | |
| ४१६.०५ | ३१ मार्च २०१९ अखेरचा शि.नफा | १२२०.६८ | |
| ३८३५९६२.६३ | अधिक :३१मार्च २०२० चा नफा | ३८४५४५२.९५ | ३८४६६७३.६३ |
| ९७४९१२३०.४३ | **एकूण बेरीज** | | १०४९४४४५३.२५ |

ठिकाण : कळवा, ठाणे
दिनांक : ०८.१२.२०२०

**अहवालाच्या शेऱ्यास पात्र राहून**
एन.एस.गोखले ॲन्ड कंपनी (चार्टर्ड अकौटंट)
वैधानिक लेखापरीक्षक.
श्री.अभय सिध्देय (पार्टनर)
मे.नं : 033522, फर्म रजि.नं:103270W
को.ऑ.ईएमपॅनल न : 16447
UDIN -20033522AAAACF4222

श्री. सुरेश आर. बारी
अंतर्गत लेखापरीक्षक, कळवा ठाणे.
पॅनल क्रमांक :– सी–१–१७४८५

## ताळेबंद पत्रक दि. ३१ मार्च २०20 अखेर

| दि. ३१ मार्च २०१९ रु. पैसे | मालमत्ता व येणी | पोट रक्कम रु. पैसे | दि. ३१ मार्च २०20 रु. पैसे |
|---|---|---|---|
| ३७०९४०८८.०७ | मागील पानावरुन... | | ४९७९१५७७.५८ |
| | **अखेरचा माल शिल्लक** | | |
| ७७०६४२०.00 | कळवा शाखा | ७३१५६00.00 | |
| २१५८२५२.00 | खारीगांव शाखा–२ | ११५०२८१.00 | |
| ७०३०६९.00 | भुसारआळी शाखा | ९०१३१५.00 | |
| ३२७३३१0.00 | ऐरोली शाखा | २२२७५२६.00 | |
| २२२३४८०.५८ | नेरुळ शाखा | १५५१२७१.५८ | |
| १३४१७१३.00 | विटावा शाखा | ७७२७६३.00 | |
| २१६८७६0.00 | सहकार मेडिकल स्टोअर्स, कळवा | २३६९९८६.00 | |
| ५७२८१८.२२ | नियंत्रित माल | ५२२६८७.१८ | |
| ८०५८७४.00 | खारीगाव शाखा–१0 | ८१५०७५.00 | |
| ५६२९३८.00 | पोस्ट ऑफिस शाखा | ३२७८६८.00 | |
| १६८७00१.00 | दिघा शाखा | ७६९६८२.00 | |
| ६८८७१६.00 | खारीगांव–१२ आनंद विहार शाखा | ४७४६५३.00 | १९११९८७०७.७६ |
| | **कायम मालमत्ता** | | |
| ४७१७०८६.८४ | डेडस्टॉक (फर्निचर, मशीनरी, वाहन) | ४६५00५0.२७ | |
| २२१३१२१९.५६ | स्थावर जंगम (इमारत) | २१४८३८८५.५६ | |
| ६२३२.00 | लायब्ररी | ७६१६.00 | २६१४१५५१.८३ |
| | **इतर येणी** | | |
| ४१७५९२0.00 | ॲडव्हॉन्स इन्कम टॅक्स / टि.डी.एस. | ४६७५९२0.00 | |
| ४१४0७0.१३ | ऐरोली मेडिकल स्टॉक येणे | ४१४0७0.१३ | |
| ११२५१६.00 | विमा | ६५८७३.00 | |
| ९८०८८.७५ | ॲडव्हॉन्स व अनामत | | |
| ७२0.00 | इमारत भाडे | २४३0.00 | |
| ३0६११.३0 | क्रेडिट कार्ड सेल्स येणे | | |
| २६४0१३९.00 | येणे व्याज (मुदत ठेवीवरील) | ३३३५३४२.00 | |
| ७५९२00.00 | शिल्लक पॅकिंग मटेरियल | ५१२000.00 | |
| ८५५२३.00 | शिल्लक स्टेशनरी | ११६२५२.00. | |
| २१0५३.६0 | रेशन खरेदी भाववाढ/घट येणे | २१0५३.६0 | |
| ५११३४४.00 | जागा भाडे येणे | ४५३३४४.00 | |
| १९२२२३.८९ | सोर्डक्सो पास कुपन येणे | १३0३५१.२५ | |
| १४0२२0.४९ | तिकिट कुपन येणे | १३४३.१0 | |
| ४६८६२२.00 | इतर जमा येणे | ८४६३७.00 | |
| | | | ९८१२६१६.0८ |
| ९७४९१२३0.४३ | एकूण बेरीज | | १0४९४४४५३.२५ |

श्री. अ. प्र. ओजाळे
चिटणीस

श्री. रा. न. भोईर
व्हा. चेअरमन

श्री. नारायण ग. गावंड
चेअरमन

छापील दरावर ४ ते ५0% पर्यंत सवलत देणारी महाराष्ट्रातील अग्रगण्य संस्था.

# कळवा मध्यवर्ती ग्राहक सहकारी संस्था मर्यादित

## सन २०२०-२०२१ वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक

| तपशिल | सन २०१९-२०२० चे अंदाजपत्रक | सन २०१९-२०२० ची प्रत्यक्ष स्थिती | अंदाजपत्रकातील फरक | | सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रक | तपशिल | सन २०१९-२०२० चे अंदाजपत्रक | सन २०१९-२०२० ची प्रत्यक्ष स्थिती | अंदाजपत्रकातील फरक | | सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | कमी | जास्त | | | | | कमी | जास्त | |
| सुरुवातीचा शि. माल | २,४३,०६,४२२.०० | २४,३०६,४२२.०० | | | १९,६१२,७७८.०० | अपेक्षित विक्री | ३६५,०००,०००.०० | ३५९,६९७,०२८.०० | ५,३०२,९७२.०० | | ३२५,०००,०००.०० |
| खरेदी | ३२,०१,२५,०००.०० | ३११,१०६,३८२.०० | ९,०१८,६१८.०० | | २८०,०७५,०००.०० | रिकामे बारदान | ९७५,०००.०० | ८२८,३६७.०० | १४६,६३३.०० | | ७७५,०००.०० |
| गाडीभाडे, पॅकींग मटेरीयल | २८,५०,०००.०० | ३,१३३,८१२.०० | | २८३,८१२.०० | ३,०५०,०००.०० | अखेर शिल्लक जमा | २१,५००,०००.०० | १९,६१२,७७८.०० | २,१८७,२२२.०० | | १२,०००,०००.०० |
| ढोबळ नफा | ४,०१,९३,५७८.०० | ४१,५९१,५५७.०० | | १,३९७,९८०.०० | ३,५०,३७,२२२.०० | **एकूण रुपये** | **३८७,४७५,०००.००** | **३८०,१३८,१७३.००** | | | **३३७,७७५,०००.००** |
| **एकूण रुपये** | **३८७,४७५,०००.००** | **३८०,१३८,१७३.००** | | | **३३७,७७५,०००.००** | | | | | | |
| ठेवींवरील दिलेले व्याज | ११,२५,०००.०० | ९५२,५४४.०० | १७२,४५६.०० | | ९२५,०००.०० | ठेवींवरील मिळालेले व्याज | २,६५०,०००.०० | २,७९९,१०६.०० | | १४९,१०६.०० | २,८००,०००.०० |
| पगार भत्ते व इतर | २,३०,००,०००.०० | २२,३९८,९२३.०० | ६०१,०७७.०० | | २५,०००,०००.०० | इमारत भाडे | २,९५०,०००.०० | २,६२४,३६५.०० | ३२५,६३५.०० | | २,८५०,०००.०० |
| संचालक उपस्थिती | १,५०,०००.०० | १३१,२५०.०० | १८,७५०.०० | | १३५,०००.०० | इतर जमा | ३,७००,०००.०० | ३,६८१,३८०.०० | १८,६२०.०० | | ३,६५०,०००.०० |
| टपाल, छपाई सामुग्री | ४,७५,०००.०० | ५१५,३७९.०० | | ४०,३७९.०० | ६००,०००.०० | शेअर्स लाभांश | ९,७५०.०० | ९,७५०.०० | | | ९,७५०.०० |
| भाडेकर, फी,वीजबत्ती | ६७,५०,०००.०० | ७,३८१,९६३.०० | | ६३१,९६३.०० | ८,५००,०००.०० | **विभागवार नफे** | | | | | |
| आयकर, विक्रीकर | २६,५०,०००.०० | ३,४८३,७७१.०० | | ८३३,७७१.०० | २,७००,०००.०० | कळवा शाखा | १३,३००,०००.०० | १४,६३४,१२०.०० | | १,३३४,१२०.०० | १५,०००,०००.०० |
| ऑडीट फी | २,००,०००.०० | २००,०००.०० | | | २००,०००.०० | खारीगांव शाखा क्र.2 | ६,५००,०००.०० | ६,८३८,०२२.०० | | ३३८,०२२.०० | ७,०००,०००.०० |
| कायदेविषयक सल्ला फी | १,००,०००.०० | ५०,०००.०० | ५०,०००.०० | | ५०,०००.०० | भुसारआळी शाखा | १,३५०,०००.०० | ९२८,४२८.०० | ४२१,५७२.०० | | |
| ग्राहक सूट | ७,५०,०००.०० | ६२०,८८७.०० | १२९,११३.०० | | ५२५,०००.०० | ऐरोली शाखा | २,६२५,०००.०० | २,८६९,०५७.०० | | २४४,०५७.०० | २,९००,०००.०० |
| सर्वसाधारण व इतर खर्च | ७२,५०,०००.०० | ६,६३३,७००.०० | ६१६,३००.०० | | ६,५००,०००.०० | नेरुळ शाखा | २,३००,०००.०० | २,३८६,०३६.०० | | ८६,०३६.०० | २,४००,०००.०० |
| घसारा | २२,५०,०००.०० | १,९२४,९८१.०० | ३२५,०१९.०० | | १,८७५,०००.०० | विटावा शाखा | ३,२५०,०००.०० | ३,५८६,२४१.०० | | ३३६,२४१.०० | ३,६००,०००.०० |
| ग्रॅच्युईटी | ५,००,०००.०० | ७६५,३५९.०० | | २६५,३५९.०० | ६५०,०००.०० | रेशन विभाग | ८००,०००.०० | ५३१,१२०.०० | | | ७५०,०००.०० |
| सोसायटी अमृत महोत्सव | ५,००,०००.०० | १,१०५,४८२.०० | | ६०५,४८२.०० | | दुध विभाग | ४००,०००.०० | २८४,९९८.०० | २६८,८८०.०० | | ३५०,०००.०० |
| सभासद व सेवक प्रशिक्षण | ६०,०००.०० | १५,३२९.०० | ४४,६७१.०० | | ५०,०००.०० | सहकार मेडिकल,कळवा | ३,८००,०००.०० | ३,१०९,९०९.०० | ११५,००२.०० | | ३,२००,०००.०० |
| ऐरोली शाखा कमिशन | ३,००,०००.०० | ६८१,१३७.०० | | ३८१,१३७.०० | १,४००,०००.०० | दिघा शाखा | २,६५०,०००.०० | २,८०१,०१९.०० | ६९०,०९१.०० | १५१,०१९.०० | ३,०००,०००.०० |
| अपेक्षित नफा | ३९,०४,७५०.०० | ३,८४५,४५३.०० | ५९,२९७.०० | | २,२४९,७५०.०० | खारीगाव शाखा क्र.10 | १,३५०,०००.०० | १,४५०,०५९.०० | | १००,०५९.०० | १,५००,०००.०० |
| | | | | | | पोस्ट ऑफीस शाखा | १,४००,०००.०० | १,१६६,३२६.०० | | | १,२५०,०००.०० |
| | | | | | | खारीगाव शाखा क्र.12 | ९३०,०००.०० | १,००६,२२२.०० | २३३,६७४.०० | ७६,२२२.०० | १,१००,०००.०० |
| **एकूण रुपये** | **४,९९,६४,७५०.00** | **५०,७०६,१५८.00** | | | **५१,३५९,७५०.00** | **एकूण रुपये** | **४९,९६४,७५०.00** | **५०,७०६,१५८.00** | | | **५१,३५९,७५०.00** |

व्हॉट्सॲप वरून मालाची ऑर्डर देण्याची सुविधा.

# लेखापरीक्षकांचा अहवाल

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव
कळवा मध्यवती ग्राहक सहकारी संस्था मर्यादित,
सहकार इमारत स्टेशन रोड, कळवा
ठाणे ४०० ६०५.

महोदय,

संदर्भ :- सर्वसाधारण सभा दि.१२.०८.२०१९ प्रमाणे लेखापरिक्षकांच्या नेमणुकीच्या ठरावानुसार

**१. आर्थिक विवरण पत्रकाबाबत वैधानिक लेखापरिक्षण अभिप्राय**

आम्ही कळवा मध्यवर्ती ग्राहक सहकारी संस्था मर्यादित, जि.ठाणे या संस्थेचे दि.०१.०४.२०१९ ते दि.३१.०३.२०२० या वर्षातील आर्थिक विवरण पत्रकांचे लेखा परिक्षण केले असून त्यामध्ये दि.३१.०३.२०२० या दिनांकाचा ताळेबंद, त्या दिनांकास संपणारे नफातोटा पत्रक आणि त्या समाविष्ट केलेल्या हिशोबाच्या धोरणाचा अर्थपूर्ण सारांश व इतर स्पष्टीकरणात्मक माहितीचा समावेश आहे.

२. आर्थिक विवरण पत्रकाबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्या अंतर्गत बनविलेल्या नियमान्वये तसेच संस्थेच्या पोटनियमानुसार आर्थिक विवरण पत्रके करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. सदर जबाबदारीमध्ये आर्थिक विवरण पत्रके तयार करताना अपहार किंवा चुका यामुळे होणाऱ्या लक्षणीय चुकापासून मुक्त राहतील अशा प्रकारे अंतर्गत नियंत्रण ठेवणेबाबत संकल्पना तयार करणे व ते अंमलात आणणे याचा समावेश असेल.

३. लेखापरिक्षकाची जबाबदारी

आर्थिक हिशोब पत्रके बनविणे ही संस्थेच्या व्यवस्थापनाची जबाबदारी असून त्यावर मत प्रदर्शन करणे ही आमची जबाबदारी आहे. आम्ही आमचे लेखापरिक्षण भारतीय सनदी लेखापाल संस्था यांनी तयार केलेले तपासणीसाठी लागू असलेले मानदंड व महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यास अनुसरुन केलेले आहे. या मापदंडानुसार आम्हाला आमच्या तपासणीची आखणी आणि अंमलबजावणी अशाप्रकारे करावी लागते की ज्यायोगे या हिशोबात लक्षणीयरित्या चुकीची विधाने केलेली नाहीत याची सर्व साधारण खात्री पटेल.

४. पंजाब आणि महाराष्ट्र बॅन्क ही बुडीत जाहीर केलेली असून न्यायालयीन प्रक्रिया चालू आहे. संस्थेने सदर बॅन्केत ठेवलेल्या ठेवीपैकी अद्यापही राहिलेले

रु.२१५६३३४/- रुपये संशयित आहेत. त्यापैकी संस्थेने ५ लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. संस्था सुद्धा इतरांच्या बरोबर न्यायालयीन प्रक्रियेमध्ये सामील आहे. आर्थिक विवरणामधील रकमा व विधानांबाबत पुरावा जमा करण्याच्या पद्धतीवर लेखा परिक्षण अवलंबून आहे. ही निवडलेली पद्धत आर्थिक विवरणामधील लक्षणीय चुकीच्या विधानांच्या, मग ती गैरव्यवहारामुळे किंवा अनवधानाने झालेल्या चुकांची असोत, जोखीम निर्धारण करण्याच्या लेखा परिक्षकाच्या निर्णयावर अवलंबुन आहे.

५. अशा जोखमींचे निर्धारण करण्यासाठी आर्थिक विवरणपत्रक तयार करणे व रास्त सादरीकरण करण्यामध्ये सोसायटीच्या अंतर्गत नियंत्रणाच्या लेखापरिक्षणाची पद्धत ठरविताना, जी सद्य परिस्थितीमध्ये योग्य आहे, लेखा परिक्षकाने विचार केलेला आहे. व्यवस्थापनाने वापरलेली हिशेबाची पद्धत व अंदाजपत्रकाचा रास्तपणा आणि तसेच एकूण आर्थिक विवरणपत्रकांचे सादरीकरण यांचे मुल्यांकन यांचाही लेखापरिक्षणामध्ये समावेश आहे.

६. लेखापरिक्षण करण्यासाठी आम्हाला योग्य व जरुर ती सर्व माहिती, पुरावे व खुलासे आम्हाला उपलब्ध झाले आहेत.

**अभिप्राय :**

७. आमच्या मते आणि आम्हाला मिळालेल्या माहिती व खुलाशाच्या आधारे व आवश्यक असलेल्या माहितीच्या आधारे सदर संस्थेचे हिशोब व एकत्रित दिलेल्या टिपणी व सहकारी संस्थेचा कायदा १९६० चा कलम महा.सहकारी नियम व संस्थेच्या नियम व पोटनियम यांना अनुसार व इतर लागु असलेल्या कायद्यानुसार तसेच संस्थांसाठी लागणारे निबंधकाने वेळोवेळी जारी केलेल्या परिपत्रकानुसार भारतामध्ये सर्वसाधारणपणे वापरल्या जाणाऱ्या हिशोबी तत्वानुसार संस्थेच्या तपासणी अहवालातील शेऱ्यास पात्र राहून सत्य व रास्त स्थिती दर्शवितात.

अ) ताळेबंदाच्या बाबतीत ३१.०३.२०२० ची संस्थेची स्थिती आणि

ब) नफाच्या अहवालासोबत जोडलेल्या लेखापरिक्षण अहवाल भाग अ,ब व क मध्ये केलेल्या
उल्लंघन व शेऱ्यास पात्र राहुन सत्य व रास्त स्थिती दर्शवीत आहे.

इतर कायदेशीर व नियमावली संदर्भात अभिप्राय

८. कोविड - १९ चा संपूर्ण भारतामध्ये होणारा वाढता प्रसार लक्षात घेऊन, दि.२१ मार्च रोजी भारत सरकारने, विषाणुचा प्रसार रोखण्यासाठी मार्च २४,२०२० पासून २१ दिवसांचा अतिशय कडक लॉकडाऊन जाहीर केला व जोपुढे दि.३० जून २०२० पर्यंत वाढविण्यात आला. याचा परिणाम असा झाला की, लेखापरिक्षण करण्यासाठी संबंधितांच्या जागी प्रत्यक्ष भेटी देण्यावर बंधने आली व इन्स्टिटयूट ऑफ अकाउंटंट ऑफ इंडियाने (ICAI) घालून दिलेल्या लेखा परिक्षणाच्या पर्यायी आदर्श पद्धतीने लेखापरिक्षण करणे जरुरीचे झाले. यामुळे, व्यवस्थापनाने पुरविलेल्या तपशीलावरच विसंबून संपूर्ण लेखापरिक्षण करण्यात आले आहे. हे लेखापरिक्षण, ऑडिटिंग अॅन्ड अॅश्शुरन्स स्टॅन्डर्ड बोर्ड ऑफ आयसीए द्वारे दिलेल्या ठसद्याच्या कोविड १९ च्या परिस्थितीचा विषेशत्वाने विचार करुन दुरस्थ

लेखापरिक्षण / संगणकाद्वारे पुरविलेल्या तपशीलावर आधारित लेखापरिक्षण यासंबंधी दिलेल्या सल्ल्यानुसार ठकेलेले आहे. व्यवस्थापनाकडून असे आश्वस्त करण्यात आले आहे. की, आमच्या लेखापरिक्षणासाठी सादर केलेला तपशील विश्वसनीय, संपूर्ण, अचूक असून संस्थेच्या हिशोब ठेवण्याच्या प्रणालीद्वारे (अकाउंटिंग सिस्टिम) निर्मित आहे व त्यामध्ये अन्य हस्तक्षेप केलेला नाही.

आर्थिक वस्तुस्थितीचे केलेले लेखापरिक्षण हे वर निर्दिष्ट केलेल्या परिस्थिती मध्ये करण्यात आलेले आहे याकडे याचा उपयोग करणाऱ्यांचे आम्ही लक्ष वेधू इच्छितो.

९. महा.सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार ताळेबंद नफा आणि तोटा पत्रक तयार करण्यात आलेले आहे.

१०. मी अहवाल देतो की

अ. लेखापरिक्षणाच्या आदेशान्वये आमच्या ज्ञानाप्रमाणे,माहितीप्रमाणे, विश्वासाप्रमाणे जरुर ती सर्व माहीती व खुलाशे मला उपलब्ध झाली आहेत व ती पुरेशी आहे.

ब. आमच्या दृष्टीस आलेले सोसायटीचे व्यवहार हे ऑडिटसाठी पुरेसे आहेत.

क. आमच्या लेखापरिक्षणासाठी संस्थेच्या कर्मचाऱ्यांकडून व शाखांकडून मिळालेले विवरण व खुलासे ऑडिटसाठी पुरेसे आहेत.

११. आमच्या मते ताळेबंद व नफा तोटा पत्रक हे लागू असलेल्या हिशेबाच्या निकषांचे अनुपालन करतात.

१२. मी पुढे असा अहवाल देतो की,

अ) ताळेबंद व नफा तोटा पत्रक / जमा खर्च पत्रक हे लागू हिशेबाच्या निकषांचे पालन करतात.

ब) आमच्या मते सोसायटीच्या हिशेबाच्या वहया कायद्यानुसार योग्य प्रकारे ठेवण्यात आल्याचे दिसून येते.

क) साल २०१९-२० या अहवाल वर्षी सोसायटीस ऑडिट वर्ग 'अ' देण्यात येत आहे.

ठिकाण : कळवा, ठाणे
दिनांक : ०८.१२.२०२०

एन.एस.गोखले ॲन्ड कंपनी (चार्टर्ड अकौटंट)
वैधानिक लेखापरीक्षक.
श्री.अभय सिध्देय (पार्टनर)
मे.नं : 033522, फर्म रजि.नं:103270W
को.ऑ.ईएमपॅनल न : 16447
UDIN -20033522AAAACF4222

व्यापार विनयेन शोभते.




गांवदेवी मैदान, कळवा येथील भव्य तांदूळ महोत्सवाचे उद्घाटन करताना मा.पोलिस आयुक्त ठाणे श्री.विवेक फणसळकर, संस्थेचे मा.चेअरमन श्री. नारायण गावंड, व इतर मान्यवर.




ठाणे महानगरपालिका परिमंडळ- १ चे मा.उपआयुक्त श्री.मनिष जोशी यांचे शुभहस्ते कोविड केअर सेंटरसाठी मदत सुपूर्द करताना मा.चेअरमन श्री. नारायण गावंड, संचालक व अधिकारी.



श्री गाडगे महाराज आश्रमशाळा, भातसई, शहापूर येथील अतिवृष्टीमध्ये बाधीत झालेल्या विद्यार्थ्यांसाठी भांडी व कपडे देताना मा.चेअरमन श्री. नारायण गावंड, व संचालक.




सभासद व कर्मचाऱ्यांच्या पाल्यानां रोख शिष्यवृत्ती व सन्मानपत्र वाटप कार्यक्रमात मा.चेअरमन श्री. नारायण गावंड, यांचेसोबत विद्यार्थी वर्ग.




संस्थेच्या मुख्य कार्यालयात आयोजित रक्त तपासणी शिबीराचे लाभार्थी.



हळदीकुंकू समारंभात सहभागी महिलावर्ग.

# कळवा मध्यवर्ती ग्राहक सहकारी संस्था मर्यादित



महाराष्ट्र राज्याचे मा.सहकार मंत्री नामदार श्री.सुभाष देशमुख यांच्या शुभहस्ते सहकार निष्ठ पुरस्कार स्विकारताना संस्थेचे मा.चेअरमन श्री. नारायण गावंड, संचालक व अधिकारी कर्मचारी वर्ग.



नगर भूमापन क्र.७२२ ते ७२८ कळवा येथील संस्थेच्या इमारत बांधकामाचे भूमिपूजन करताना ठाण्याचे महापौर मा.श्री.नरेश म्हस्के, मा.प्रमिलाताई केणी, मा.मिलिंद पाटील, माजी उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश श्री.आप्पासाहेब गिरमकर.




मा.नामदार श्री.श्रीकांत शिंदे यांनी संस्थेस दिलेली सदिच्छा भेट.

प्रेषक :

**कळवा मध्यवर्ती ग्राहक सहकारी संस्था मर्यादित**

कळवा, ठाणे - ४०० ६०५.

मुख्य कार्यालय : सहकार इमारत, स्टेशन रोड, कळवा, ठाणे - ४०० ६०५

फोन : ०२२-२५३३ ७९२४ / २५३४ ७४२९

ई-मेल : info@sahakarbazar.com

सभासद नं.

**बुक-पोस्ट**

श्री./ श्रीमती. ____________________

____________________

____________________

____________________